**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com**

**उस्मानाबाद कृषी हवामान सल्ला** **शुक्रवार दिनांक – ०६.१२.२०१९**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक ०७ ते ११ डिसेंबर, २०१९) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | ०७/१२ | ०८/१२ | ०९/१२ | १०/१२ | ११/१२ |
| पाऊस (मिमी) | ००.० | ००.० | ००.० | ००.० | ००.० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३०.० | ३०.० | २९.० | ३१.० | ३०.० |
| किमान तापमान (अं.से.) | १७.० | १८.० | १९.० | १९.० | १८.० |
| ढग स्थिती (आकाश) | स्वच्छ | स्वच्छ | ढगाळ | ढगाळ | स्वच्छ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७४ | ७८ | ७८ | ७३ | ७४ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३४ | ४१ | ५० | ४७ | ३९ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | १० | ११ | १० | १० | ०९ |
| वा-याची दिशा | आग्नेय | आग्नेय | आग्नेय | आग्नेय | आग्नेय |

| हवामानाचा इशारा | जिल्हयात पुढील पाच दिवसात आकाश स्वच्छ ते अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. | |
|---|---|---|
| **पिकांचे नाव** | **अवस्था** | **कृषि हवामान सल्ला** |
| हरभरा | फांदया फुटणे | हरभरा पिकावरील रोपे कुरतडणा-या अळीचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस २० टक्के २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून रोपालगत जमिनीवर फवारणी करावी. हरभरा पिकात घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. |
| गहु | पेरणी / मुकूटमुळे फुटणे | गहु पिकाच्या उशिरा पेरणीसाठी सारा पध्दतीचा अवलंब करावा. गहु पिकाची पेरणी करून २१ दिवस झाले असल्यास मुकूटमुळे फुटणे या अवस्थेत नत्राचा दुसरा हप्ता ५० किलो नत्र प्रती हेक्टरी देऊन पिकास पाणी दयावे. |
| ऊस | ऊगवण अवस्था | ऑक्टोबर – नोव्हेंबर महिन्यात लागवड केलेल्या ऊस पिकातील तणांचे व्यवस्थापन करून पाण्याची पहिली पाळी दयावी. |
| हळद | कंद वाढीची अवस्था | हळद पिकात पानावरील ठिपके रोगाच्या व्यवस्थापनासाठी मॅन्कोझेब २५ ग्रॅम किंवा कार्बेन्डॅझिम १० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. हळद पिकावरील कंदमाशीच्या व्यवस्थापनासाठी उघडे पडलेले कंद झाकून घ्यावेत व क्लोरपायरीफॉस ५० टक्के ५०० मिली प्रती एकर याप्रमाणात आळवणी करावी. |
| संत्रा /मोसंबी | फळ वाढीची अवस्था | संत्रा / मोसंबी फळबागेतील तणनियंत्रण करावे. वाढ न झालेले व रोगग्रस्त फळे काढून घ्यावीत. बागेस आवश्यकतेनूसार ठिबक सिंचन पध्दतीने संरक्षित पाणी दयावे. |
| डाळिंब | फळ वाढीची अवस्था | डाळिंब बागेत फळांची प्रत खालावू नये म्हणून फळांना बटर पेपर लावावेत. बागेस ठिबक सिंचन पध्दतीने पाणी दयावे. |

| | | |
|---|---|---|
| फुल शेती | कळया लागणे अवस्था | गुलाब पिकावरील कळया खाणारी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. |
| भाजीपाला | वाढीची अवस्था | काकडीवर्गीय भाजीपाला पिकात फळमाशीचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी प्रती एकरी दोन ते तीन कामगंध सापळे लावावेत. |
| चारा पिके | वाढीची अवस्था | गवतवर्गीय चारा पिकाची लागवड करून एक महिन्याचा कालावधी झाला असल्यास नत्राचा दुसरा हप्ता ५० किलो नत्र प्रती हेक्टरी दयावा. |

**सदर कृषी सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.**